


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ४० वा बुधवार दि. १२ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# टेकाळेंच्या खुल्या चौकशीसाठी तारांकित करण्यासाठी विरोधीपक्ष नेता यांना साकड...

## दैनिक जनसंचलनचा भ्रष्टाचारावर आणखी एक प्रहार




पाठपुरावा

सिटी न्युज & दैनिक जनसंचलन

टेकाळे अन् भूखंड सम्राट : ये रिश्ता क्या कहलाता है?

महसूल विभागात नियमबाह्य कामांचा मोठा झोल

अजून बरेच काही पुढील भागात

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी गेल्या अनेक वर्षांच्या आपल्या महसूल विभागातील सेवेच्या काळात अत्यंत बेशरमपणे केलेल्या बेबंद भ्रष्टाचारातून प्रचंड अशी अवैध संपत्ती गोळा केली आहे. ही संपत्ती त्यांनी स्वतःसह पत्नी, भाऊ आणि इतर नातेवाईकांच्या नावावर केलेली आहे. त्यांच्या या संपूर्ण बेकायदेशीर संपत्तीची खुली चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आता पुढाकार घेतला असून यासंदर्भात विरोधी पक्ष नेता आ.भास्कर जाधव यांना यासंदर्भात पत्र दिले आहे.या पत्रामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक यांच्याकडे करण्यात आलेला तक्रार अर्ज तसेच जिल्हाधिकारी आण जिल्हा पोलिस उपअधीक्षकांशी केलेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देण्यात आला आहे.महसूल विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड म्हणजे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हे आहेत. विजय टेकाळे यांनी आपल्या २५-३० वर्षांच्या महसूल विभागातील सेवेत अत्यंत घाणेरडे असे गैरप्रकार आणि गैरव्यवहार केलेले आहेत. महसूल विभागात राहून त्यांनी एकीकडे शासनाच्याच महसूलाला चुना लावलेला आहे. दुसरीकडे अनेक नागरिकांच्या संपत्तींमध्ये हेरफेर करून आपल्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. अनेक केसेसमध्ये संपत्तीच्या वारसा हक्काच्या कागदपत्रांमध्ये त्यांनी हेरफेर केलेला आहे. जमीन महसूल अधिनियमात प्रचंड टेकाळेंनी गैरप्रकार केलेले आहेत. खरे तर टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची गाथा लिहायची झाल्यास १०० कागद देखील कमी पडतील, अशी स्थिती आहे. सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे आज महसूल प्रशासनातील जिल्हाधिकाऱ्यांपासून ते अपर जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत आणि उपजिल्हाधिकाऱ्यांपासून ते उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वच अधिकारी हे टेकाळे यांच्यासमोर अत्यंत लाचार झालेले आहेत. टेकाळे यांनी अख्खे महसूल प्रशासन आपल्या दावणीला बांधून घेतली, अशी स्थिती आहे. कारण अत्यंत बेशरमपणाने आणि कोडगेपणाने टेकाळे यांनी जो काही भ्रष्टाचार केलेला आहे तो महसूल विभागाच्या सगळ्या अधिकाऱ्यांना माहिती आहे. परंतु तरीही टेकाळेंवर कारवाई होत नाही, याचा अर्थ स्पष्ट आहे की, महसूल विभागातील अनेक अधिकारी हे टेकाळेंच्या

**माळविहिर शिवारातील सोन्याच्या किमतीची ती भांनगडीची नियमात न बसणारी करोडो रुपयांची शेती त्या उदयोजकांनी कशी मंडळ अधिकारी तलाठी यांच्या माध्यमातून नियमित केली पुढील सत्रात**

भ्रष्टाचारात सामील आहेत. त्यामुळे टेकाळे यांना अक्षरशः ब्लॅकमेल करतात. टेकाळे हे आपल्याच अधिकाऱ्यांवर दबाव टाकून आणि प्रसंगी आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवून काम करतात. परंतु तरीही त्यांच्यावर कारवाई करण्याची कुणाही अधिकाऱ्याची हिम्मत होताना दिसून येत नाही. टेकाळे यांनी जो काही भ्रष्टाचार केला त्या पैशांतून त्यांनी प्रचंड अशी बेनामी संपत्ती गोळा केली आहे. ही संपत्ती त्यांनी आपल्या भावाच्या, पत्नीच्या नावावर तसेच इतर नातेवाईकांच्या नावावर देखील केलेली आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने एकीकडे वृत्तमालिकेद्वारे सातत्याने प्रकाशित करण्यात येत आहे, तर दुसरीकडे सातत्याने महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंत्री यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम केले जात आहे. दैनिक जनसंचलन ने स्वतः पुढाकार घेऊन टेकाळे यांच्या बेनामी संपत्तीची अनेक कागदपत्रे मिळवली आहेत. याचे संपूर्ण पुरावे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडेही सादर केलेले आहेत. त्या पुराव्यांवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महसूल व पोलिस विभागाशी पत्रव्यवहार करून टेकाळेंवर कारवाई करण्यासंदर्भात सांगितले आहे. मात्र ना महसूल विभाग ना पोलिस प्रशासन कोणीही टेकाळेंवर कारवाई करण्यास पुढे येत नाही. टेकाळेंच्या सोबतच महसूल प्रशासनातील काही अधिकारी देखील प्रचंड मस्तवाल झालेले आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने जेंव्हा टेकाळेंच्या संपत्तीसंदर्भात कागदपत्रांची नक्कल मागण्यात आली होती, त्या वेळी महसूल विभागातील एका अव्वल कारकून धनवटे यांनी ही कागदपत्रे देण्यास चक्क नकार दिला होता. यावरून महसूल प्रशासन किती मुजोर झाले हे दिसून येते.अखेर दैनिक जनसंचलनच्या वतीने यासंदर्भात आता विरोधी पक्ष नेते जाधव यांना पत्र पाठवून त्यांना टेकाळे यांच्या भ्रष्टाचार प्रकरणी तसेच त्यांची अवैध संपत्ती जप्त करण्यासंदर्भात अर्थसंकल्प अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करण्यासंदर्भात साकडे घातले आहे. राज्यात नव्याने पदारूढ झालेल्या फडणवीस सरकारने तरी टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची विषवल्ली तात्काळ नष्ट करावी, ही अपेक्षा आहे.

# गुप्तधनाच्या लालसेसाठी पाच वर्षीय मुलीच्या नरबळीचा कट! भोंदू बाबाचा धक्कादायक पर्दाफाश

जनसंचलन/ धामणगाव

गुप्तधनाच्या हव्यासापोटी पाच वर्षीय निष्पाप मुलीचा नरबळी देण्याचा कट रचणाऱ्या भोंदू बाबाचा पोलिसांनी चोख तपास करून पर्दाफाश केला आहे. भोकरदन तालुक्यातील वालसा वडाळा येथील ज्ञानेश्वर आहेर यांच्या आत्महत्येच्या तपासात ही थरारक माहिती उघड झाली. पोलिसांनी या प्रकरणी भोंदू बाबा गणेश लोखंडे याला अटक केली असून त्याने कबुली जबाब दिला आहे. ३ मार्च रोजी ज्ञानेश्वर आहेर यांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांना त्यांच्या खिशात एक चिठ्ठी मिळाली. त्यातून धामणगाव येथील भोंदू बाबा गणेश लोखंडे याने दिलेल्या मानसिक त्रासामुळे आत्महत्या झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी तात्काळ गणेश लोखंडे याला अटक करून जबरदस्त तपास केला असता धक्कादायक सत्य समोर आले. गणेश लोखंडे याने धामणगाव येथील एका शापित घरात मोठे गुप्तधन असल्याचा अफवा पसरवून ते घर विकत घेतले. त्या घरात २० फूट खोल खड्डा खणून तो नरबळीच्या तयारीत होता. विशेष म्हणजे, या नरबळीसाठी त्याने ज्ञानेश्वर आहेर यांच्या पाच वर्षीय मुलीची निवड केली होती. ती मुलगी ङ्गपायाळूफ जन्मली आहे, त्यामुळे ती गुप्तधन मिळवण्यासाठी आवश्यक असल्याचा अंधविश्वास त्याने बाळगला होता. लोखंडे याने आहेर कुटुंबीयांना मानसिक त्रास देण्यासाठी त्यांची मुलगी माझीच आहे, ती मला द्या असे सांगितले होते. एवढेच नाही, तर त्याने वकिलामार्फत ज्ञानेश्वर आहेर यांना मानहानीची नोटीसही पाठवली. या सततच्या छळामुळे मानसिक तणावात येऊन ज्ञानेश्वर आहेर यांनी आत्महत्या केली. भोकरदन पोलिसांनी आरोपीच्या जुन्या घराची झडती घेतली असता दोन बाय तीन फूटाचा २० फूट खोल खड्डा आढळून आला. या खड्ड्यातच नरबळी देण्याचा त्याचा कट होता. घटनास्थळी पोलिसांना इलेक्ट्रिक ब्रेकर, खड्डा खोदण्यासाठी लागणारे साहित्य आणि ङ्गगोरख तंत्रफ नावाचे तांत्रिक साधनेचे पुस्तक सापडले.

# जगी एका स्त्रीविना: घरांगण सुना सुना

## संपादकीय लेख

भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. ङ्कयत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!ङ्क या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो. अशी आपबिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांनी व्यक्त केली आहे... संपादक.

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संपूर्ण विश्वाच्या पाठीवर इ.स.१९११ साली पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला होता. तथापि सन १९१०च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. ङ्कयत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!ङ्क या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो.

घरात जोपर्यंत स्त्रीचा वावर असतो, तोपर्यंतच त्या घरास घरपण असते. म्हातारे लोक म्हणतात त्याप्रमाणे ती देवता-लक्ष्मीच असते. त्या घरात तिच्या सहवासाने जीवंतपणा, शांती, प्रेम, वात्सल्य, दया, नम्रता, हे दैवी गुण ठासून असतात. स्त्रीविरहित घर एकप्रकारचे स्मशान असते. कोरोनाच्या जबरदस्त प्रादुर्भावात सन २०२१मध्ये माझी प्रेमळ पत्नी- आशाताई मरण पावली आणि माझ्या घराची आण, बाण व शान पुरती धुळिला मिळाली. कोना न कोना प्रसन्न वाटणारा तेव्हा अडगळ भासू लागला. सगेसोयरे, शेजारी व समाज यांच्या दरम्यान प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. त्यांचे पाहुणे म्हणून येणे, बसणे, ऊठणे, हसणे, खिदळणे, बागडणे सारे काही हराम झाले. ङ्कअतिथी देवो भवः!ङ्क या सुवर्ण क्षणासाठी मन आतुर होऊ लागले.

ती माऊली गेल्यापासून घरातील शीतल साऊलीच हरपली, असे वाटत होते. घरात एका पाठोपाठ एक असे चार मांजरीचे पिल्लू पाळून पाहिले, मात्र तीनचार-तीनचार महिन्यांच्या अंतराने बिचारे मरतच गेले. आपणच महापातकी आहोत की काय? अशी अपराधीपणाची भावना मनात घर करून बसली आहे. घराच्या वळचणीत, खिडकीत किंवा विजेच्या तारांवर आपले घरटे बांधून रोज आनंदाने चिवचिवाट करणारी चिमणीही तेव्हा दिसेनाशी झाली होती. घरात इकडून तिकडे व तिकडून इकडे दिवसात कितीतरी चकरा मारणारी चिचुंद्री पण दिसेल तर शप्पथ! इतका मोठ्ठा फरक आपण त्या घटकेला अनुभवला आहे, हे पांढऱ्या शुभ्र स्पटिकाप्रमाणे सत्य आहे. नेहमी ये-जा करत असणारे आपले अत्यंत काळजीवाहू नातलगसुद्धा ही स्मशान शांतता अनुभवत होते. एवढा फरक काही काळ- दोन वर्षे घरात एकही स्त्री नसल्याने पडलेला दिसला. यावरून आपण सूज्ञ वाचक स्त्रीचे श्रेष्ठत्व मोठे किती? कसे? आणि का? याचा अंदाज अवश्य बांधू शकाल, यात तिळमात्रही शंका नाही!

घरातली क्षुल्लकशी वाटणारी धुणे, भांडी, झाडलोट, स्वयंपाक, पाणी, आदी कामे उरकताना आपल्याला तारेवरची कसरत करावी लागत होती. घरबांधणी, घराची मालकी, राशनकार्ड, स्वयंपाकाचे गॅस कनेक्शन आधी सगळी जडावजड जबाबदाऱ्या तिने लिलया पेलल्या होत्या. खरे तर हे सगळे करताना आम्हास रडू कोसळत होते आणि ३३ कोटी देव आठवू लागले होते. वेळेवर आम्ही बापलेक अंघोळ, स्वयंपाक, जेवण, कपडे धुणे कधी केले काय नि कधी ना केले काय? विचारतो तरी कोण? नेहमीचा अंघोळ करा, जेवण करा... असा कळवळ्याचा सज्जड दम विरला होता. काळ्याकुट्ट अंधारातही काना न कोपऱ्यातील चकाकणाऱ्या वस्तू राहू द्या, परंतु लख्ख सूर्य प्रकाशातील अंगण तर सद्या घरात सर्व माणसे मृतप्राय शरीरेचङ्क असल्याची स्पष्ट साक्ष देत होते. घराचे घरपण, घरसजावट किंवा घरांगण स्वच्छता आदी एका स्त्रीजातीशिवाय शेकडो माणसेही पाहिजे तशी ठेवू शकत नाहीत. हे आज आपण पावन आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्त प्रामाणिकपणे मांडणे, आपले अहोभाग्य समजतोय! मागील वर्षी दि.१० फेब्रुवारी २०२३ रोजी मुलगा- इंजि.दुर्वांकुर यांचा विवाह उरकून सून- पल्लवीताई लक्ष्मीच्या पावलाने घरात आली आणि आमचा जीव भांड्यात पडला. आता खुप प्रसन्न वाटत आहे. तिनेही गृहलक्ष्मीची समस्त जवाबदारी आता समर्थपणे पेलून धरली आहे, हे येथे मला अभिमानाने नोंदवावे लागत आहे.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. दि.८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे सन १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले, तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, शाळा, महाविद्यालय व अन्य कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा होऊ लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होताना दिसून येतो. इ.स.१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. सन १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा, असे आवाहन का बरे केले असावे? क्रांतिसूर्य जोतीबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदींनी स्त्रीमुक्ती चळवळीत स्वतःला का समर्पित केले? याचे कोडे आज आपल्याला उलगडले आहे, हे पुनः पुन्हा सांगणे न लगेच!

!!जागतिक महिला दिनाच्या सर्व भगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा!!

# गो. से. महाविद्यालयातील शस्त्र व नाणे प्रदर्शनाला खामगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचालित गो. से विज्ञान,कला व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभाग व स्वराज्य सेवा प्रतिष्ठान चांदूर,बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहासाचे मुक साक्षीदार,विदर्भाचे शस्त्रागार या दोन दिवसीय शस्त्रे व नाणे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रदर्शनातील शिवकालीन शस्त्रे व प्राचीन दुर्मीळ नाणी पाहण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच खामगाव व परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवार दिनांक २४/०२/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता मा.श्री अशोकजी थोरात (अपर पोलीस अधीक्षक) यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. प्रकाशजी तांबट (उपाध्यक्ष, वि. शि. प्र. मंडळ, खामगाव), तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. अजिंक्यजी बोबडे (कोषाध्यक्ष, वि. शि. प्र. मंडळ, खामगाव), श्री. शिवाभाऊ काळे (अध्यक्ष स्वराज्य सेवा प्रतिष्ठान, चांदूर बाजार ) श्री.राजेश पाटील (नाणे संग्रहक व अभ्यासक), आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सर हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मा. अशोकजी थोरात साहेब यांनी मराठा कालखंडातील युद्ध कला व त्यामध्ये वापरण्यात आलेल्या विविध शस्त्रांचे महत्त्व सांगितले. प्रा. राजेश पाटील यांनी इतिहासात नाण्यांचे असणारे महत्त्व विशद करताना, नाणे राज्याच्या आर्थिक संपन्नतेचे प्रतीक समजले जाते, नाण्यांवरूनच इतिहासातील राजवंश,शासक यांच्या काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय तसेच सांस्कृतिक स्थिती समजण्यास मदत होते हे समजावून सांगितले. त्याचबरोबर मा. श्री. शिवा काळे यांनी प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या शिवकालीन धोप तलवारी, पट्टा, खंडा, जबरदंड, मराठा, मोगल, राजस्थानी कट्यारी,जंबिया, बिचवे, छोटी तोफ व तोफांचे लहान मोठे गोळे, विविध प्रकारच्या कुऱ्हाडी, धनुष्यबाण, ढाल, त्याचबरोबर लहान-मोठी असे शंभरहुन अधिक शस्त्रे या सर्वांची इत्यंभूत माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सर यांनी, विद्यार्थ्यांनी इतिहासातून कोणता बोध घ्यावा व आपल्या जबाबदाऱ्या काय आहेत याची जाणीव ठेवावी असे सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. एम. एस. वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन इतिहास विभाग प्रमुख प्रा. एस. एम. शिंदे यांनी केले.उद्घाटनानंतर हे प्रदर्शन सर्व नागरिकांसाठी खुले ठेवण्यात आले होते. खामगावकरांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेटी देऊन आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना, असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा व्हावेत ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजना मागे मार्गदर्शक म्हणून डॉ. पी. पी. ठाकूर, डॉ. एस. टी. वराळे, डॉ. डी.



एन. व्यास, डॉ. एच. ए. भोसले यांचा मोलाचा वाटा होता. कार्यक्रमाचे आयोजन इतिहास विभागाचे प्रा.एस.एम.शिंदे प्रा.एस.एस.कापसे, प्रा.आर.व्ही.ढाकणे,प्रा.एम.एस.वाघमारे प्रा.पी.एल.बानाईत यांनी केले. तसेच डॉ.किशोर वानखेडे डॉ.जयेश तातेड व ग्रंथपाल श्री. गुडभेले सर व सर्व ग्रंथालय कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय डॉ. सुभाषजी बोडबे, संस्थेचे सचिव मा. डॉ. प्रशांत बोबडे यांनी कौतुक केले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदे सरकारनं सुरु केलेली योजना फडणवीस सरकारनं गुंडाळली

## कोट्यवधी लाभार्थ्यांना बसणार फटका...

**मुंबई:** महायुती सरकारची लोकप्रिय योजना आनंदाचा शोधा योजना आता बंद करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर ही योजना सुरु करण्यात आली होती. शिंदे यांचे राजकीय गुरु आनंद दिघे यांच्या नावे ही योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून सणासुदीला राज्यातील १ कोटी ६३ लाख लोकांना लाभ मिळत होता. पण आता राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाल्यानं आनंदाचा शिधा योजना गुंडाळण्यात आली आहे. आनंदाचा शिधा योजनेच्या माध्यमातून रेशन कार्डधारकांना सणासुदीच्या काळात एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चणा डाळ, एक लीटर पामतेल दिलं जात होतं. गरिबांचा सण गोड करण्याच्या उद्देशानं शिंदे सरकारनं ही योजना सुरु करण्यात आली होती.

पण आता फडणवीस सरकारनं ही योजना बंद केली आहे. नवीन सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पात आनंदाचा शिधा योजनेला बगल देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून दसरा, दिवाळी, गुढीपाडवा अशा सणांना रवा, साखर, चणा डाळ, तेल अवघ्या १०० रुपयांमध्ये दिलं जायचं. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी ही योजना सुरु केली होती. पण आता नव्या सरकारनं ही योजना बंद केली आहे.आनंदाचा शिधा योजना बंद होण्यामागचं निश्चित कारण समोर समोर आलेलं नाही. पण या योजनेला लाडकी बहीण योजनेचा फटका बसला असल्याची चर्चा आहे. लाडकी बहीण योजनेमुळे अनेक योजनांना कात्री लागलेली आहे.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठा भार पडला आहे. सरकारनं या योजनेसाठी यंदा केलेली तरतूद गेल्या आर्थिक वर्षातील तरतुदीपेक्षा कमी आहे. योजनेच्या अटी, शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. यामुळे लाभार्थी महिलांची संख्या घटणार आहे.महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यास महिलांना मिळणारा हप्ता १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्यात येईल, असं आश्वासन देण्यात आलं होतं. पण काल सादर झालेल्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणांना मिळणार हप्ता वाढवण्यात आलेला नाही.

# पाकिस्तानात ट्रेन हायजॅक; बलुच बंडखोरांकडून ४५० प्रवासी ओलिस, ६ सैनिकांची हत्या



पाकिस्तानात दहशतवाद्यांनी ट्रेन हायजॅक केल्याचा दावा केला आहे. बलुच लिबरेशन आर्मी नावाच्या संघटनेनं बोलन प्रांतात जाफर एक्स्प्रेस हायजॅक केल्याचा दावा केला. एक्स्प्रेसमधील ४५० प्रवाशांना ओलीस ठेवण्यात आलं आहे. आमच्याविरोधात लष्करी कारवाई केल्यास सगळ्या प्रवाशांना ठार करु, अशी धमकी बलुच लिबरेशन आर्मीकडून देण्यात आली आहे. पाकिस्तानी माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार ट्रेनमध्ये ४५० प्रवासी आहेत. यामुळे पाकिस्तानात मोठी खळबळ उडाली आहे. बलुच लिबरेशन आर्मीच्या दहशतवाद्यांनी हायजॅक केलेल्या ट्रेनमध्ये पाकिस्तानी लष्कर, पोलीस, दहशतवाद विरोधी दल आणि इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे कर्तव्यावर असलेले कर्मचारी आहेत. हे सगळे सुट्टीसाठी पंजाबला जात होते. ट्रेनमधील सैनिकांनी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचा प्रयत्न केल्यास सगळ्या ओलिसांना मारुन टाकू, अशी थेट धमकी बलुच लिबरेशन आर्मीकडून देण्यात आलेली आहे. दहशतवाद्यांनी पाकिस्तानी लष्कराच्या ६ सैनिकांची हत्या केली आहे.बलुच लिबरेशन आर्मीच्या दहशतवाद्यांनी महिला, लहान मुलांसह बलुच प्रवाशांची सुटका केली आहे. बलुच लिबरेशन आर्मीचा फिदायीन तुकडी, मजीद ब्रिगेड या संपूर्ण कारवाईचं नेतृत्व करत आहे. या सगळ्या कारवाईत फतेह स्कॉड, एसटीओएस आणि गोपनीय शाखेचाही सहभाग आहे.बलुच समूहांनी काही दिवसांपूर्वीच पाकिस्तान आणि चीनविरोधात एका नव्या हल्ल्याची घोषणा केली होती. बलुच समूहांनी नुकताच सिंधी फुटिरतावादी समूहांसोबत युद्धाभ्यास पूर्ण केला आहे. बलुच राजी अजाओई संगरनं याबद्दल एक संयुक्त प्रेस रिलीज जारी केलं होतं. त्यातून एका निर्णायक युद्ध रणनीतीची घोषणा करण्यात आली होती.बलुच राजी अजाओई संगरमुळे पाकिस्तानातील चीनकडून संचालित केल्या जाणाऱ्या अनेक सीपीईसी प्रकल्पांना मोठा धोका निर्माण झाला आहे. बलुच राजी अजाओई संगरची एक संयुक्त बैठक नुकतीच झाली. त्यानंतर एक निवेदन जारी करण्यात आलं. या बैठकीत सहयोगी बलुच लिबरेशन आर्मी, बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट, बलुच रिपब्लिकन गार्ड्स, सिंधी लिबरेशन ऑर्गनायझेशन सिंधू देश रिव्हॉल्युशनरी आर्मीच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळानं सहभाग घेतला होता.

# पुण्यात आढळला मानवी हाडांचा सापळा, अन् शेजारी... धक्कादायक प्रकाराने खळबळ....

**येरवडा :** खुळेवाडी येथील एलआयसी मोकळ्या मैदानावर मानवी हाडांचा सापळा आणि कवटी आढळल्याने खळबळ उडाली. विमानतळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतल्यानंतर मोबाइल आणि आधार कार्ड सापडले. ससून रुग्णालयाच्या माहितीनंतर या हाडांचा उलगडा होईल. लोहगावमधील खुळेवाडी मैदानावर एका व्यक्तीचा हाडांचा सापळा पडल्याची माहिती नियंत्रण कक्षाला मिळाली. विमानतळ पोलिस घटनास्थळी पोहोचल्यावर मानवी व्यक्तीची सात प्रकारची हाडे आणि कवटी दिसली. त्या ठिकाणी पोलिसांना मोबाइल फोन आणि शिवकुमार के. या नावाचे आधार कार्ड मिळले. पोलिसांनी पंचनामा करून हाडे पुढील तपासासाठी ससून रुग्णालयात पाठवली आहेत. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, सहायक आयुक्त प्रांजली सोनावणे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या.

घरबसल्या टास्कद्वारे डिजिटल मार्केटिंगच्या, ऑनलाइन पार्ट टाइम जॉब मिळवून देण्याच्या आमिषाने हडपसरमधील माजी सैनिकाच्या पत्नीला १३ लाख ६९ हजार रुपयांना गंडा घातल्याचे समोर आले आहे. ही घटना सात फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारीदरम्यान घडली. या प्रकरणी अज्ञात टेलिग्राम आयडी यूजर, वेबसाइट व बँक खातेधारकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सच्चिदानंद पांडे (वय ५१, रा. टक्कर इन्क्लेव्ह सोसायटी, गोंधळेनगर, हडपसर) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मोगले यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार गोंधळेनगर येथील आर्मी सोसायटीमध्ये राहतात. घरबसल्या पार्ट टाइम जॉब करून पैसे कमवू शकता. तुम्ही गृहिणी असाल, तर ग्रुपमध्ये सहभागी व्हा. दिवसाला पंधराशे ते पाच क्राइम डायरी हजार रुपये कमवू शकता, असे. त्यांच्या पत्नीला अज्ञात नंबरवरून एकाने फोन करून सांगितले.

तक्रारदारांच्या पत्नीने नंबर दिल्यानंतर टेलिग्राम ग्रुपमध्ये ५०० पेक्षा जास्त नंबर घेतलेले होते. ग्रुप ॲडमिन राकेशकुमार होते. ग्रुपमधील इतर लोक प्रॉफिट होत असल्याचा स्क्रीनशॉट टाकत होते. सुरवातीला तक्रारदारांच्या पत्नीला गुगल रिव्हा देण्याचा डमी टास्क देण्यात आला. त्यानंतर शंभर रुपये प्रॉफिट मिळाला. त्यानंतर अकाउंट काढण्यास सांगून बिटकॉइनमध्ये २६ हजार ५०० रुपयांची गुंतवणूक केली. त्याचाही प्रॉफिट मिळाला मात्र नंतर रक्कम मिळाली नाही.

तुमच्या चुकीने अकाउंट बंद झाल्याचे समोरील व्यक्तीने फोनवर सांगितले. त्यानंतर वेळोवेळी पैसे पाठवूनही रक्कम मिळाली नाही. त्यानंतर फसवणूक झाल्याची खात्री पटली असता, हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. पोलिस निरीक्षक नीलेश जगदाळे पुढील तपास करीत आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित शर्मा कुलदीप यादववर ट्रॉफी घेण्यापूर्वी का भडकला होता, समोर आलं आता खरं कारण...

**दुबई :** भारताने फायनल जिंकली आणि जोरदार सेलिब्रेशन सुरु झाले. त्यानंतर भारतीय संघाला मेडल्स देण्याचा कार्यक्रम सुरु झाला आणि त्यानंतर भारतीय संघाला विजेतेपदाची ट्रॉफी देण्यात येणार होती. पण ट्रॉफी प्रदान करण्यापूर्वी रोहित शर्मा कुलदीप यादववर चांगलाच भडकलेला पाहायला मिळाला. भारताने विजय मिळवल्यावर मैदानात भारतीय संघाचा जयघोष सुरु होता. त्यानंतर खेळाडूंनी जल्लोष करत चाहत्यांना आपल्या भावना सांगितल्या. आयसीसीने त्यावेळी पारितोषिक वितरणाची तयारी केली. विजेत्या भारतीय संघासाठी खास ब्लेझर्स आणले



होते. भारतीय संघाला मेडल्स देण्यात येणार होते. त्यानंतर रोहित शर्माच्या हातात चषक प्रदान करण्यात येणार होता. पण त्यावेळी मैदानात अशी एक गोष्ट घडली की, त्यावेळी रोहित शर्मा हा कुलदीप यादववर चांगलाच भडकलेला पाहायला मिळाला होता.ही गोष्ट घडली जेव्हा बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी हे भारताच्या खेळाडूंना ब्लेझर्स देत होते. खेळाडू बिन्नी यांच्याकडे जात होते आणि त्यांच्या दोन्ही हातांमध्ये ब्लेझर्स घातले जात होते. रोहित शर्मा यावेळी शेवटच्या क्रमांकावर होता आणि त्याच्यापुढे कुलदीप यादव होता. कुलदीप यादव हा बिन्नी यांच्या जवळ गेला आणि आता काही सेकंदात तो ब्लेझर घालून खाली उतरणार, असे वाटत होते. पण त्यावेळी कुलदीप यादवने असं काही केलं की, त्याला तो ब्लेझर घालताच येत नव्हता. बिन्नी यांनी यावेळी बरेच प्रयत्न केले. पण कुलदीपला काही हे ब्लेझर घालता येत नव्हते. त्यावेळी रोहित शर्मावर कॅमेरा फिरला आणि त्यावेळी रोहित शर्मा कुलदीप यादववर चांगलाच भडकला पाहायला मिळाले. कारण त्यावेळी संपूर्ण क्रिकेट विश्व तो कार्यक्रम पाहत होता. त्यामुळे संपूर्ण जगासमोर भारताची लाज जात होती. त्यामुळे रोहित शर्मा त्याच्याकडे रागाने पाहत होता. पण त्यावेळी कुलदीप यादवला आपली चूक समजली आणि तो तिथे थांबलाच नाही, तो पुढे चालत गेला आणि त्यामुळे भारताची लाज वाचली आणि थोड्या वेळाने रोहित शर्मा शांत झाल्याचे पाहायला मिळाले.रोहित शर्मा कुलदीपवर भडकल्याचे पाहून रॉजर बिन्नीदेखील थोडेसे हैराण झाले होते. कारण ते कुलदीपला ब्लेझर घालण्याचा प्रयत्न करत होते. पण कुलदीपला काही तो ब्लेझर घालताच येत नव्हता. त्यामुळे रोहित कुलदीपवर भडकला होता. पण त्यानंतर बिन्नीदेखील ही गोष्ट विसरले आणि त्यांनी रोहित शर्माला पुढ बोलवत त्याला ब्लेझर दिला.

# शाहरुख खानच्या डोक्याचा ताप वाढला, मन्नत कायद्याच्या कचाट्यात, काय आहे नेमकं प्रकरण?





**मुंबई:** बॉलिवूडचा किंग खान शाहरुख खान याचा मुंबईतला बंगला त्याच्या चाहत्यांनी खास स्पॉट आहे. हजारो लोक रोज या मन्नत बंगल्यासमोर उभं राहून फोटो काढत असतात. त्याच्या या अलिशान बंगल्याची गेल्या काही महिन्यांपासून चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी शाहरुख खान हा बंगला सोडून काही काळासाठी भाड्याच्या घरात राहणार असल्याचं म्हटलं जात होतं. पण आता या मन्नत बंगल्याचा नवीन वाद समोर आला आहे. काही महिन्यांपूर्वी शाहरुखची पत्नी गौरी खान हिनं मन्नत बंगल्याचं नुतनीकरण करण्याचा निर्णय घेतला. पण हा बंगला अतिशय जुना असल्यानं सरकारी खात्याकडून परवानग्या घेऊनच कामं करावी लागणार आहेत. या रेवोव्हेशनच्या कामासाठी प्राधिकरणाची परवानगी असणं गरजेचं आहे. पण आता शाहरुख आणि गौरीवर मन्नतमधील नूतनीकरणासाठी कोस्टल रेग्युलेशन झोनच्या परवानगीचे उल्लंघन केल्याचा आरोप केला जात आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाला पत्र लिहून शाहरुख खान आणि महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीने कोस्टल रेग्युलेशन झोनच्या परवानगीचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. शाहरुख खानवर आरोप केल्यानंतरराष्ट्रीय हरित न्यायाधिकरणने संतोष दौंडकर यांना शाहरुख खानवरील आरोपांबाबत पुरावे सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, न्यायिक सदस्य दिनेश कुमार सिंह आणि तज्ज्ञ सदस्य विजय कुलकर्णी यांचा समावेश असलेल्या समितीनं सांगितलं की, ञ्झ्जर प्रकल्प प्रस्तावक किंवा एमसीझेडएमएनं कोणत्याही योग्य प्रक्रियेचं उल्लंघन केलं असेल, तर अपीलकर्त्याला चार आठवड्यांच्या आत योग्य पुराव्यांसह ते सिद्ध करावे लागतील, असं न केल्यास या न्यायाधिकरणाच्या आदेशाचं पालन न केल्याबद्दल प्रवेशाच्या टप्प्यावरच अपील फेटाळण्याशिवाय आमच्याकडे पर्याय राहणार नाही. एनजीटी या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ एप्रिल रोजी करणार आहे.

दरम्यान, मन्नत बंगल्यात दोन आणखी मजले वाढण्याचं काम सुरू असल्यानं किंग खान कुटुंबासह भाड्याच्या घरात शिफ्ट झाल्याचंही म्हटलं जात होतं. मात्र यावर त्याच्या टीमकडून अधिकृत माहिती देण्यात आली नाहीये.

# आयपीएलच्या आधी आरोग्य मंत्रालयाची मोठी विनंती, त्या बड्या कंपन्यांना फटका बसणार?



**नागपूर :** आयपीएल सामन्यांदरम्यान मैदानाच्या परिसरात आणि दूरचित्रवाणीवरील प्रसारणामध्ये तंबाखूजन्य पदार्थ आणि मद्याच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाहिराती करू नयेत, अशी विनंती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केली आहे. सार्वजनिक आरोग्याचा विचार करणे ही नैतिक जबाबदारी आहे, असे त्यांनी म्हटले आहे. २२ मार्चपासून आयपीएलचे सामने सुरू होत असून, त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हे निर्देश दिले आहेत. आयपीएलचे () अध्यक्ष अरुणसिंह धुमाळ यांना आरोग्यसेवांच्या महासंचालकांनी पत्र पाठवले आहे. सामन्यांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ आणि मद्याच्या विक्रीस बंदी घालण्याची सूचनाही या पत्रात करण्यात आली आहे. मद्य किंवा तंबाखूशी संबंधित उत्पादनांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जाहिरात करणे खेळाडू, समालोचकांनीही टाळावे, यावर पत्रात भर देण्यात आला आहे.या पत्रात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचाही उल्लेख करण्यात आला आहे. भारतात हृदयरोग, कर्करोग, फुफ्फुसांचे आजार, मधुमेह, उच्च रक्तदाब आदींमुळे दरवर्षी ७० टक्क्यांहून अधिक मृत्यू होतात. तंबाखू आणि मद्याचे सेवन हे असंसर्गजन्य आजारांच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. जगभरात तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर असून, दरवर्षी सुमारे १४ लाख नागरिक जीव गमावतात, तर मानसिक चिंतेवर पर्याय म्हणून भारतात मद्याचे सेवन होते, याकडे पत्राद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.आयपीएल ही भारतात सर्वाधिक पाहिली जाणारी क्रीडा स्पर्धा असल्याने कोणत्याही व्यासपीठावर तंबाखू, मद्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रसार होणे हे आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल परस्परविरोधी संदेश देणारे आहे, असे पत्रात अधोरेखित केले आहे. आयपीएलने स्टेडियमच्या परिसरात आणि दूरचित्रवाणीवर प्रसारित होणाऱ्या सामन्यांमध्ये तंबाखू आणि मद्याच्या जाहिरातींवर आणि विक्रीवर बंदी घालणे, याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये वरुण चक्रवर्तीवर अन्याय झाला? रविचंद्रन अश्विनने आयसीसीवर केले मोठे गंभीर आरोप....

**मुंबई:** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी वरुण चक्रवर्तीचा सुरुवातीच्या संघात समावेश करण्यात आला नव्हता, परंतु स्पर्धेपूर्वी इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत त्याच्या प्रभावी कामगिरीच्या आधारे त्याला स्थान देण्यात आले. कोलकाता नाईट रायडर्सच्या या गोलंदाजाचा समावेश टीम इंडियासाठी गेम चेंजर ठरला. त्याने स्पर्धेत शानदार कामगिरी केली आणि ९ विकेट्स घेतल्या. सामना जिंकणारा असूनही, त्याला मालिकावीर म्हणून निवडण्यात आले नाही आणि हीच गोष्ट रविचंद्रन अश्विनला त्रास देत आहे. अश्विनच्या मते, चक्रवर्तीच्या उत्कृष्ट कामगिरीमुळेच रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने जेतेपद जिंकले. चक्रवर्ती संपूर्ण स्पर्धा खेळला नाही, परंतु तरीही तो कर्णधार रोहित आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या विश्वासाला सार्थ ठरवला. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून घोषित करण्यात आले, परंतु अश्विनचा असा विश्वास आहे की हा पुरस्कार चक्रवर्तीला मिळायला हवा होता. अश्विन म्हणाला- काहीही म्हणूया, माझ्या मते वरुण चक्रवर्ती हा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू होता. तो संपूर्ण स्पर्धा खेळला नाही. पण त्यांनी खूप मोठा फरक पाडला. जर वरुण चक्रवर्ती नसता तर हा सामना खूप वेगळा




असता. त्याने एक्स-फॅक्टर जोडला. जर मी न्यायाधीश असतो तर मी हा पुरस्कार वरुणला दिला असता. चक्रवर्तीच्या चेंडूने अश्विन खूप प्रभावित झाला ज्याने त्याने ग्लेन फिलिप्सला बाद केले.बघा त्याने ग्लेन फिलिप्सला कसे बाद केले. तो स्टंप झाकत नव्हता, म्हणून वरुण क्रीजच्या बाहेर आला आणि त्याने गुगली टाकली. माझ्या मते वरुणला मालिकावीराचा पुरस्कार मिळाला पाहिजे. हा पुरस्कार ज्याने सर्वात मोठा फरक घडवला त्यालाच द्यायला हवा. वरुण चक्रवर्ती हा मालिकावीर पुरस्कारासाठी पात्र आहे. या विजयाचे श्रेय अश्विनने गोलंदाजांनाही दिले. अंतिम सामन्यात न्यूझीलंडला २५१/७ पर्यंत रोखल्याबद्दल त्यांनी गोलंदाजी युनिटचे कौतुक केले. अश्विन म्हणाला.अश्विन म्हणाला, मी रोहित आणि गौतम गंभीरसाठी खूप आनंदी आहे. गौतम गंभीरचा विचार करा. तो कोणत्या टप्प्यातून जात असेल? न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका गमावल्याने. पण तुम्ही एक उल्लेखनीय निर्णय घेतला. त्याने कठीण काळात संघाची जबाबदारी घेतली आणि संघाला विजय मिळवून दिला. हा विजय गंभीरसाठी खूप भावनिक असावा. जसप्रीत बुमराह तिथे नव्हता. उल्लेखनीय म्हणजे, या भारतीय संघाने बुमराहशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. मी खूप आनंदी आहे. मला वाटतं जगाला भारतीय क्रिकेट समजून घेण्यासाठी थोडा वेळ लागेल. अंतिम सामन्यानंतर, चक्रवर्तीने कबूल केले की, त्याची ही स्पर्धा अशा प्रकारे जाईल अशी त्याला अपेक्षा नव्हती. मला असे घडेल अशी अपेक्षा नव्हती. स्वप्न सत्यात उतरले. चक्रवर्तीच्या गोलंदाजीने सर्वांनाच आश्चर्यचकित केले. त्याने आपल्या फिरकी गोलंदाजीने फलंदाजांना खूप त्रास दिला. त्याचे चेंडू समजणे कठीण होते. हेच कारण होते की तो इतका यशस्वी झाला. चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणे भारतीय संघासाठी खूप खास होता. संघात जसप्रीत बुमराह सारख्या स्टार गोलंदाजाची कमतरता होती, तरीही संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. गौतम गंभीरच्या प्रशिक्षणाखाली आणि रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली संघाने एकजुटीने खेळ केला आणि विजेतेपद जिंकले. या विजयाने भारतीय क्रिकेटसाठी एक नवा अध्याय लिहिला. या विजयावरून हे सिद्ध होते की भारतीय क्रिकेटमध्ये प्रतिभेची कमतरता नाही.

## चाहत्याच्या कानशिलात मारणं गोविंदाला पडलेलं भारी; नऊ वर्ष कायद्याच्या कचाट्यात

**मुंबई** - गोविंदा हा बॉलिवूडचा सुपरस्टार आहे. ९० च्या दशकात त्याने त्याच्या चित्रपटांनी, दमदार अभिनयानं आणि नृत्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं. आजही गोविंदाचे लाखो चाहते आहेत. अलीकडेच, गोविंदाने त्याच्या आयुष्यातील सर्वात कठीण टप्प्यांपैकी एक, नऊ वर्षांच्या कायदेशीर लढाईबद्दल खुलासा केला. २००८ मध्ये, त्याने मनी है तो हनी है च्या सेटवर एका चाहत्याला कानशिलात मारली होती. यामुळे तो कायदेशीर अडचणीत सापडला. या कठीण काळात त्याला कोणाकडूनही पाठिंबा मिळाला नाही आणि कायदेशीर अडचणींशी लढण्यासाठी तो एकटाच राहिला, असं अभिनेत्याने अलीकडेच उघड केलं. मुकेश खन्ना यांच्यासोबतच्या संभाषणात गोविंदाने सांगितलं की, वाद वाढल्यानंतर त्याला कोणाचाही पाठिंबा मिळाला नाही. तो म्हणाला, मी संतोष नावाच्या व्यक्तीविरुद्ध न्यायालयात पुरावे सादर केले. पण, महिला मला सांगत होत्या की तो एक चांगला माणूस आहे, कृपया त्याचं काहीही वाईट करू नका. मी देवाचे खूप आभार मानतो. मी पाहिलं की कोणीही मला पाठिंबा दिला नाही. कानशिलात मारण्याच्या प्रकरणात कोणताही आधार नाही.गोविंदाने कबूल केलं की, अशा घटनांचा व्यक्तीच्या आत्मविश्वासावर खोलवर परिणाम होतो, ज्यामुळे त्याला एकटं आणि असुरक्षित वाटतं. त्यावेळी त्याची प्रचंड लोकप्रियता असूनही, तो अनेक वर्षे कायदेशीर अडचणीत सापडला ज्याची त्याने कधीही अपेक्षा केली नव्हती.ही घटना २००८ ची आहे, जेव्हा गोविंदा त्याच्या यशाच्या शिखरावर होता. चाहते अनेकदा त्यांच्या आवडत्या अभिनेत्याची एक झलक पाहण्यासाठी शूटिंग पाहण्यासाठी एकत्र येत असत. त्या दिवशी, स्वत:ला गोविंदाचा कट्टर चाहता म्हणून सांगणारा संतोष, मनी है तो हनी हैच्या मुंबई सेटवर उपस्थित असलेल्या गर्दीत होता. यादरम्यान गोविंदाला राग आला आणि त्याने संतोषला कानशिलात मारली.

# चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यावर भारतीय संघाची विक्टरी परेड होणार की नाही...

**दुबई :** रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने सलग दोन वर्षांत दोन आयसीसीची जेतेपदं जिंकली आहेत. भारताने जेव्हा टी २० वर्ल्ड कप जिंकला होता, त्यानंतर मुंबईत विक्टरी परेड काढण्यात आली होती. त्यानंतर आता चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यावर भारतीय संघाची विक्टरी परेड कुठे होणार, हा प्रश्न चाहत्यांना पडलेला आहे.



भारताने टी २० वर्ल्ड कप वेस्ट इंडिजमध्ये जिंकला होता. त्यानंतर भारतीय संघ काही दिवस वादळात अडकला होता. पण त्यानंतर जेव्हा भारताचा संघ मायदेशात परतला तेव्हा त्यांना प्रथम नवी दिल्लीत उतरवण्यात आले होते. भारतीय संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताचा संघ मुंबईत दाखल झाला आणि त्यानंतर त्यांची विक्टरी परेड काढण्यात आली होती. त्यावेळी चाहत्यांनी आपल्या लाडक्या खेळाडूंना वर्ल्ड कप ट्रॉफीसह लाइव्ह पाहिले होते. त्यानंतर भारतीय संघाचा अभूतपूर्व असा सत्कार वानखेडे स्टेडियमवर करण्यात आला होता. त्यावेळी भारताचे माजी क्रिकेटपटूंसह प्रशासकही उपस्थित होते.भराताने त्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे आता २०२५ साली चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे. त्यामुळे आता भारतीय संघाची विक्टरी परेड नेमकी कधी आणि कुठे होणार, याची उत्सुकता सर्वच चाहत्यांना लागलेली आहे. पण यावेळी चाहत्यांचा हिरमोड होणार आहे. कारण चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यावर भारतीय संघाची विक्टरी परेड होणार नसल्याचे आता समोर आले आहे. ही विक्टरी परेड का होणार नाही, याचे कारणही आता समोर आले आहे.

भारताने रविवारी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली, त्यावेळी ९ मार्च ही तारीख होती. पण आता २२ मार्चपासून आयपीएलला सुरुवात होणार आहे . त्यामुळे आता खेळाडूंना आयपीएलता सराव करण्यासाठी फार कमी वेळ मिळणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यावर भारतीय संघ विक्टरी परेड काढणार नसल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे भारतीय खेळाडू दुबईतून आल्यावर आपल्या घरी जातील आणि त्यानंतर ते आयपीएलच्या सरावासाठी आपल्या संघाकडे जातील, असे आता समोर येत आहे.भारतीय संघाची विक्टरी परेड झाली असती तर चाहत्यांचा आनंद द्विगुणित झाला असता. पण यावेळी मात्र विक्टरी परेड होणार नसल्याचे आता समोर आले आहे. त्यामुळे चाहते या गोष्टीमुळे नाराज होऊ शकतात. पण येत्या काही दिवसांत हे लाडके खेळाडू त्यांना आयपीएलमध्ये खेळताना पाहायला मिळू शकतात.

# राष्ट्रवादी पक्षाने निवडणुकीवेळी मला ४० लाख दिले, आमदाराचा सर्वात मोठा खुलासा...




**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके हे त्यांच्या एका वक्तव्याने वादात सापडले आहेत. निवडणूक खर्चासाठी आम्हाला ४० ते ५० लाख मर्यादा घालून दिली असताना आपले १० ते १२ कोटी रुपये खर्च झाले, असं प्रकाश सोळंके म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यावर प्रकाश सोळंके यांनी आज खुलासा दिला आहे. यावेळी त्यांनी काही व्हायरल व्हिडीओवरही प्रतिक्रिया दिलीय. आमची कोणती ना कोणती जुनी प्रकरणं शोधली जात आहेत, असं प्रकाश सोळंके म्हणाले. मी ते भाषणात बोललो होतो. मी लाईटमूडमध्ये बोलत होतो. विनोदातून ती घटना घडली. विरोधकांनी एवढा खर्च केला. तर मी एवढा खर्च केला, असं म्हणालो. नंतर मी भाषण संपल्यावरही स्पष्ट केलं होतं की काही लाखात खर्च केला होता. मी आणि पक्षाने मिळून खर्च केला. मला ज्या मर्यादा घालून देण्यात आल्या होत्या, राष्ट्रवादी पक्षाने मला ४० लाख रुपये पाठवले होते. त्यापैकी २३ लाख रुपये खर्च झाला. उरलेला पैसा मी पक्षाला परत केला. मला पक्षाने ऑफिशियल पैसे दिले होते. आमच्या पक्षाने प्रत्येकाला दिले. मी प्रतिज्ञापत्रात बरोबर उल्लेख केलेला आहे. मला पक्षाने चेकने पैसे मिळाले होते. सगळे रेकॉर्ड आहेत, असं स्पष्टीकरण प्रकाश सोळंके यांनी दिलं.सुशील सोळंके यांचा मारहाण करतानाचा व्हिडीओ जाहीर झाला आहे. त्याची पार्श्वभूमी अशी आहे की, सुशील सोळंके यांच्या आई सादोळा या गावच्या सरपंच आहेत. त्या ठिकाणी सर्व ग्रामपंचायत सदस्य या महिला आहेत. या महिलांची एक ट्रीम गणपती पुळे आणि नाणस या ग्रामपंचायतीला भेट देण्यासाठी बस करुन गेले होते. विरोधकांनी एका ग्रामपंचायत सदस्याच्या घरी जावून तुम्ही तुमच्या बायकांना गोव्याला का पाठवल्या, त्यांनी अर्धनग्न अवस्थेत नृत्य केलं असा आरोप अशोक सोळंके याने केला, अशी माहिती प्रकाश सोळंके यांनी दिलीयाबाबत अशोक सोळंके याला मारहाण झाली. त्याच्याविरोधात एफआयर दाखल झाली आहे.

या गोष्टीचा राग घेऊन सुशील सोळंके त्याला जाब विचारायला गेला. त्यावेळी त्याची पत्नीदेखील सोबत होती. त्याने बोलण्याच्या माध्यमातून अरेरावी केली म्हणून त्या ठिकाणी मारहाण झाली. या मारहाणीप्रकरणी सुशील सोळंकेवर त्याच दिवशी गुन्हा नोंद झाला होता. त्याला हायकोर्टाच्या माध्यमातून अंतरिम जामीन मिळाला आहे. त्याला अटक करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, असं स्पष्टीकरण प्रकाश सोळंके यांनी दिलं.तहसीलदारचं प्रकरण म्हणजे संबंधित तहसीलदार शेतकऱ्यांचे नदीमधील विजेचे कनेक्शन तोडण्यासाठी त्या गावात गेल्या होत्या. महातपुरीन नावाचं ते गाव आहे. त्या गावातील सर्व महिला आणि पुरुष हे तहसीलदारांना ते वीज कनेक्शन तोडण्यासाठी विरोध करत होते. त्यावेळेला बाहेर गावातून ५०० लोकं आली. त्यांनी तहसीलदाराला घेराव घातला. तहसीलदाराच्या जीवाला धोका निर्माण झाला म्हणून त्यावेळच्या जिल्हाधिकारी मुंडे मॅडम यांनी मला फोन केला की, आमच्या तहसीलदारांचा जीव धोक्यात आहे. तुम्ही स्वतः तिथे जावं. त्यामुळे मी तिथे गेलो, असं प्रकाश सोळंके यांनी सांगितलं.लोकांना बाजूला केलं. थोडसं शांत केलं आणि तहसीलदाराची गाडी गावाबाहेर काढून दिली. त्यावेळी लोकांच्या भावना प्रक्षोभक होत्या. साहजिकच आहे, आपल्या पिकांचं पाणी तोडलं जाणार ही भावना शेतकऱ्याला मान्य होत नाही. तहसीलदारांनी समजूतीच्या भावनेने त्यांनी विषय सोडवायला हवा होता. पण त्या पोलीस गाडी घेऊन गेल्या. म्हणून लोकांच्या भावना प्रक्षोभक होता, अशी प्रतिक्रिया प्रकाश सोळंके यांनी दिली.

# वडिलांनाच जबर मारहाण अन् आकस्मिक मृत्यू भासवला, पोटच्या मुलाचे कृत्य....

**अहिल्यानगर :** शिर्डीत घरगुती वादातून पोटच्या मुलानेच वडिलांना संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने शिर्डी पुन्हा हादरली आहे. घरगुती वादातून मुलाकडून वडिलांना पाईपने जबर मारहाण करण्यात आली. यामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यांना मारहाण झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले आहे. यामध्ये शिर्डी पोलिसांनी स्वतःच तक्रारदार होऊन कायदेशीर कारवाई करत आहेत. आरोपी मुलगा शुभम दत्तात्रय गोंदकर याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. वृत्तानुसार, ६ मार्चच्या घडलेल्या या घटनेचा पाच दिवसांनंतर उलगडा झाला आहे. सुरवातीला दत्तात्रय गोंदकर यांचा आकस्मिक मृत्यू असल्याचे भासवण्यात आले. मात्र शवविच्छेदन अहवालातून जबर मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे सत्य समोर आले. शिर्डीतील प्रतिष्ठित कुटुंबात घरगुती वादातून ही हत्या झाल्याचे समोर येतेय. याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस




उपनिरीक्षक निवांत जगजितसिंह जाधव यांनी तक्रार दिली आहे. तक्रारीत असे नमूद करण्यात आले की, दत्तात्रय शंकरराव गोंदकर वय ५४ वर्षे रा.हॉटेल साई, नाला रोड, शिर्डी यांचा राहत्या घरात मृतदेह आढळून आला. यानंतर पोलिसांनी मयत व्यक्तीचा पंचनामा देखील केला आणि मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी रवाना केला. ७ मार्चला लोणी येथे पोस्टमॉर्टम करण्यात आले. याप्रकरणी दत्तात्रय यांच्या पत्नी संजीवनी दत्तात्रय गोंदकर तसेच त्यांचे पुतणे व चुलत भाऊ यांच्याकडे चौकशी करण्यात आली. १० मार्चला पोस्टमॉर्टम रिपोर्ट हाती आला. दत्तात्रय यांच्या तिन्ही बहिणींना चौकशीसाठी बोलवण्यात आले. त्यांनीही त्यांना मारहाण झाल्याचा संशय व्यक्त केला. शुभम गोंदकर याच्यावर पोलिसांना संशय होता. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता ६ मार्चला आईशी झटापट झाल्याने त्याला राग अनावर झाला होता. त्यामुळे मी मारहाण केल्याचे त्याने कबुल केले आहे. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास शिर्डी पोलीस करीत आहे.

# दिवसभर रस्त्याचं काम केलं, रात्री पुलाजवळच झोपी गेले, अज्ञात वाहनांची धडक अन्..

**जळगाव:** सोमवारी रात्री जळगाव खुर्द जवळ तीन परप्रांतीय तरुण एका लोखंडी पट्टीवर झोपले असता त्यांना अज्ञात वाहनाने मध्यरात्री चिरडले. ही घटना सकाळी मंगळवारी उघडकीस आली.



जळगाव तालुक्यातील नशिराबादगाव जवळील जळगाव खुर्द गावाच्या पुलाजवळ रात्री तीन परप्रांतीय तरुण लोखंडी पट्टीवर झोपलेले असताना अज्ञात वाहनाने तिघांना एकाच वेळी चिरडल्याची धक्कादायक बाब मंगळवारी ११ मार्च रोजी सकाळी उघडकीला आली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर नशिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहेत. नशिराबाद गावाच्या पुरढ असलेल्या जळगाव खुर्द गावाजवळील रेल्वे उड्डाणपुलाच्या बाजूला रोडचे काम सुरू आहे. या ठिकाणी मजूर काम करत असतात. रस्त्याच्या शेजारी असलेल्या पुलावर ते झोपले होते. मजूर झोपलेले असताना अंधारात काही न दिसल्याने अज्ञात वाहनाने तिघांना जागेवरच चिरडले असल्याचे निर्दर्शनास येत आहे. हे तीनही मजूर परप्रातांतून आले होते. ही दुर्देवी घटना मंगळवारी ११ मार्च रोजी सकाळी ७वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे. याघटनेची माहिती मिळाल्यानंतर नशिराबाद पोलिसांनी घटनास्थळी पोहचले. यासंदर्भात नशिराबाद पोलीसठाण्यात नोंद करण्यात आली आहे. पोलिस या घटनेचा तपास करत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेस १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

जनसंचलन/बुलढाणा

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. योजनेंतर्गत यापुर्वी दिलेल्या मुदतीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे स्विकारण्यात आलेले आहेत. मात्र अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. योजनाचे ऑनलाईन अर्ज भरण्याची व भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक सर्व कागदपत्रांसह जमा करण्याची मुदत १५ जानेवारीपर्यंत होती. तथापि योजनेची व्याप्ती तालुका स्तरापर्यंत असल्यामुळे विहित मुदतीत अनेक विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाहीत. त्यामुळे शासनाने १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी https:// hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज यापुर्वी अनेक विद्यार्थ्यांनी भरले आहेत, त्यांनी सुध्दा बँक तपशिल भरण्यासाठी विद्यार्थी लॉगीनमध्ये नवीन टॅब उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी बँक तपशिल भरुन अर्ज करावा. अन्यथा सदर योजनेचा लाभ दिल्या जाणार नाही, यांची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना अर्जाची सद्य:स्थिती त्यांच्या लॉगीनमध्ये आयडी व पासवर्ड वापरुन पाहता येणार आहे.

# कापूस खरेदीसाठी शेतकऱ्यांनी १५ मार्चपर्यंत नोंदणी करावी

जनसंचलन/बुलढाणा



भारतीय कापूस निगमच्या शासकीय कापूस खरेदी योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी दि.१५ मार्च पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, चालू हंगाम २०२४-२५ ऑक्टोबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ मध्ये किमान आधारभूत किमंतीवर (एमएसपी) कापूस विक्री करण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आगाऊ किंवा जागेवर नोंदणी करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. १५ मार्च पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

# उपोषणकर्त्यांसाठी जागा निश्चित

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालय तसेच विविध शासकीय कार्यालयासमोर उपोषणकर्ते वारंवार रस्त्याच्या बाजुला किंवा फुटपाथवर मंडप टाकुन उपोषणास बसतात. त्यामुळे रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होतो. असे प्रकार टाळण्यासाठी नगर परिषद यांनी उपोषण करण्याची जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार उपोषणकर्त्यांनी येथील जिजामाता प्रेक्षगार समोरील मोकळी जागेत उपोषण करावे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी दिली.

# बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

जनसंचलन/ रायपूर

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. २४ ते २८ मार्च २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे. प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी



दि. २४ मार्चपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# शुक्रवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा रूग्णालयात नियमितपणे शुक्रवारी नेत्र, मतिमंद, कान, नाक व घसा संबधित दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र शुक्रवार, दि. १४ मार्च रोजी धूलिवंदन निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यालयात माईंडफुलनेस चा संदेश -डॉ वैशाली निकम




जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे दिनांक ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त माता पालक संघ आणि सखी सावित्री मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने यश दूर नाही या वर ङ्घङ्घसौंदर्याचा मार्ग हृदयापासून सुरू होतो तर कर्तुत्वाजवळ थांबतोङ्घङ्घ यावर अतिशय उत्कृष्ट असं मार्गदर्शन डॉ.सौ वैशाली निकम मॅडम यांनी शिवाजी विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच सर्व महिला शिक्षकांना केले एकाग्रता वाढवण्यासाठी माईंड फुलनेसचा कसा वापर करावा याची विद्यार्थ्यांना कल्पना दिली तसेच मनाला व शरीराला सुंदर बनवण्यासाठी किती किती वेळ द्यावा याचं मार्गदर्शन करून आपल्या मनातला विचार वाचा व त्याकडे लक्ष द्या त्यासाठी योगा व ध्यान याची गरज आहे हा संदेश दिला सदर कार्यक्रमा ला पालक प्रतिनिधी वैशालीताई कुऱ्हे यांनी उपस्थिती लावली व कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्रा. श्री कावरे सर यांनी स्वीकारले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजपूत सर यांनी केले व सूत्रसंचालन वैशाली हिंगे यांनी केले तर आभार कु. पिवतकर यांनी मानले

# वि.हि.प बुलढाणा शहर प्रखंड समिती घोषित!

जनसंचलन/बुलढाणा

धार्मिक,सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात जगभर कार्यरत असलेल्या विश्व हिंदू परिषद बुलढाणा शहर प्रखंड समितीची घोषणा करण्यात आली कारंजा चौक बुलढाणा स्तित राम जानकी मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीत बुलढाणा शहर प्रखंड उपाध्यक्ष नरेंद्र बैरागी, शहर मंत्री ऍड नितीन जाधव, बजरंग दल शहर संयोजक राहुल बेंडवाल,सह संयोजक प्रतीक कदम,शहर गौरक्षा प्रमुख गजानन खंडारे,विध्यार्थी प्रमुख कार्तिक भोरकडे यांच्या दायत्वाची घोषणा विश्व हिंदू परिषद बुलढाणा जिल्हा मंत्री माधव धुंदाळे यांनी केली प्रसंघी जिल्हा अध्यक्ष ऍड जयंत जोशी,जिल्हा सहमंत्री ज्ञानेश्वर माळोदे,बुलढाणा शहर अध्यक्ष उत्कर्ष डाफणे,मातृशक्ती विभाग संयोजिका वैशाली शेळके,बजरंग दल जिल्हा सह संयोजक गणेश थोरवे,दुर्गावाहिनी जिल्हा सह संयोजिका श्रद्धा चोपडे उपस्तित होते. प्रसंघी ७-८-९-मार्च रोजी नागपूर येथे झालेल्या प्रांत बैठकीत बुलढाणा विभाग संयोजिका वैशाली शेळके तर बुलढाणा जिल्हा संयोजिका ज्योती डाखोरे तर



दुर्गा वाहिनी जिल्हा सह संयोजिका श्रद्धा चोपडे यांच्या पदाची घोषणा प्रांत मंत्री प्रशांत तितरे यांनी केल्याची माहिती सुद्धा जिल्हा मंत्री माधव धुंदाळे यांनी दिली.

# बुलडाण्याच्या एकल महिला सन्मान चळवळीला अकोल्यातही बळ....

## महिला सक्षमीकरण, शासकिय योजना, पुनर्वसन आदी विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन

जनसंचलन/बुलढाणा

विधवा व एकल महीलांच्या सन्मानार्थ अकोल्यात विधवा परिषद आज पार पडली. ही परिषद परिवर्तनाची नांदी ठरावी अशीच झाली. विविध शासकीय योजनांचे स्टॉल लावून अधिकाऱ्यांनी महिला सक्षमीकरणाचा मूलमंत्र दिला तर जिल्हाधिकारी अजित कुंभारे यांनी जुन्या वाईट अनिष्ट रूढी परंपरा त्यागून काळानुरूप बदल स्वीकारत एकल महिलांनी प्रगतीची कास धरावी असे आवाहन केले.मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डी एस लहाने यांनी ही चळवळ बुलढाण्यातून सुरू केली तिला अकोलेकरांनी बळ दिले आहे. महिला व बाल विकास विभाग अकोला, माणस फाउंडेशन, सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला,एन्करेज एज्युकेशनल फाऊंडेशन अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त ही एकल महिला परिशद जानोरकर मंगल कार्यालय, कौलखेड अकोला येथे आज थाटात पार पडली. जिल्हाधिकारी अजित कुंभारे यांनी उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थान सौ अनिता गुरव जिल्हा महिला व बाल विकास समिती अकोला यांनी भुसवले . तर मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डी एस लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती.मार्गदर्शन करताना जुन्या वाईट चालीरीती रूढी परंपरा अंधश्रद्धा यांना तीलाजली देऊन एकल महिलांनी आपला सर्वांगीण विकास करून घेण्याची गरज आहे . कोणत्याही वाईट प्रसंगाला न घाबरता शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेऊन आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा त्यासाठी शासन आपल्या नेहमी पाठीशी राहील असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले. या मेळाव्यात जिल्ह्यातील एकल महिला त्यांचे प्रश्न समस्या विवंचना, सक्षमीकरण, शासन योजना, पुनर्वसन आदी विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शक केले .तसेच शासनाच्या विविध योजनेची माहिती देण्यात आले. प्रास्ताविक मध्ये. श्दत्तात्रय श्रीराम



लहाने, मानस फाऊंडेशन बुलढाणा यांनी भूमिका विशद केली. त्यांनी महिलांच्या समस्यांविषयी व विकासाविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अकोला, श्रीमती रजिया सुलताना बुलढाणा ,आरती टाकळकर सामाजिक कार्यकर्त्या एकल महिला परिषद ,नरेश मानकर ,डॉ. नेहा मानकर, तुषार हांडे, प्रा. शिवराम बावस्कर, गजानन हरणे समाजसेवक, राजू लाडूलकर (डी.सी.पी.यु.),सुनील लाडूलकर, सुनिल वनारे ,श्रीमती रुपाली पांडे (जिल्हा संरक्षण अधिकारी) यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या रक्तगट, रक्तदाब व रक्त शर्करा तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/ खामगाव

राष्ट्रीय सेवा योजना,गो.से विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव द्वारा आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत महाविद्यालयाच्या प प्राणीशास्त्र विभागाद्वारे, डॉ जी. बी. काळे यांच्या मुख्य मार्गदर्शनात संपन्न झालेल्या रक्त शर्करा, रक्तगट व रक्तदाब तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यादरम्यान सुमारे १०६ नागरिकांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. सदर शिबिराकरिता टेक्निकल टीम मध्ये बी.एस.सी. भाग ३ च्या प्राची खंडागळे, वेदिका भोसले, कोमल बाभुळकर, तर बी.एससी. भाग २ च्या कु. प्रेरणा शिंदे, आरती बोचरे, कविता डोबे, अमृता आमले, अनुजा बनकर, प्रिया निमकर्डे, प्रिया चव्हाण, गायत्री राजपूत, गायत्री उमाळे त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन सदर शिबिर शिबिरास सहकार्य केले. इतर मार्गदर्शक म्हणून विभागातील प्रा. सुहास पिढेकर, प्रा मनोज बाबळे, प्रा. सचिन खंडारे, प्रा. ज्योती शर्मा, प्रा. अनिकेत वानखडे यांची उपस्थिती होती.




शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सांख्यिकी विभागातील डॉ. एम. ओ. वानखडे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक नागरिक, डॉ. नीता बोचे, प्रा. उमेश खंडारे, प्रा. कोमल काळे, ज्ञानगंगापुरचे सरपंच श्री. ज्ञानेश्वर महाले, उपसरपंच सौ. संगीता सूर्यवंशी, पोलीस पाटील श्री. रामदास वानखडे, ग्रामसेवक ज्ञानेश्वर आंबोरे, श्री अरुण महाले, श्री शिवदास महाले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी प्रतिनिधी श्री. प्रकाश शर्मा व कु. गौरी देशमुख यांची उपस्थिती होती.

# कर्जबाजारी युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



जनसंचलन/ देऊळगाव मही

देऊळगाव राजा तालुक्यातील नारायणखेड येथील नरहरी ऊर्फ बालू बनसोडे (वय ३५) यांनी १० मार्च रोजी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. बनसोडे यांनी मायक्रो फायनान्सकडून १ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्याची परतफेड महिन्यातील सात दिवस करावी लागत असल्याने काही हप्ते थकले. परिणामी, त्यांना नोटीस पाठवण्यात आली होती, त्यामुळे ते मोठ्या आर्थिक संकटात सापडले. नरहरी बनसोडे हे अल्पभूधारक शेतकरी होते. शेतीतून मिळणारे उत्पन्नही तोकडे होते. परिणामी, कर्जाचे हप्ते फेडण्याचा प्रश्न गंभीर बनला. या तणावातूनच त्यांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. मृत्यूनंतर त्यांच्या पश्चात पत्नी, आई आणि दोन लहान मले असा परिवार आहे

# मनाशी संकल्प करा मी नियमित धावणार : विद्या बेंडाळे

जनसंचलन/बुलढाणा

हसत खेळत धावत चालत तुम्ही मॅरेथॉन पूर्ण करू, फक्त इच्छाशली पाहिजे. महिलांनीच एकमेकींना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. इतरांचा कोणताही विचार न करता आपण धाकण्याची सुरुवात करा. सुरुवात ही फार महत्त्वाची आहे. महिलांनी काही ठरवले तर ते होऊ शकते. आज तुम्ही या मॅरेथॉनमध्ये धावला. आता मनाशी संकल्प करा भी नियमित धावणार, प्रलोकाला काहीतरी करावेसे वाटते त्यासाठी वयाची अट नाही. आपल्याला आबा खेप्रकारात आपण मना-पासून सुरुवात करा आणि त्याचा आनंद घ्या. शारीरिक, मानसिक स्वास्थ्यासाठी चालणे धावगे पळने आवश्यक आहे, असे प्रतिपादन जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित ताराबाई शिंदे बुमनस्न्सच्या उद्घाटन प्रसंगी बँड अँबेसिडर विद्या बेडाचे केले. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात अजिंठा मागांवरील निवांत लॉन परिसरातून महिलांची अजिंठाकडे झेपावणारी पावले मॅरेथॉनमध्ये दिसून आली. जिद्द व आत्मविश्वास येऊन मोठ्था उत्साहाने ज्ञानगंगा रनर्स ग्रुपने आयोजित केलेल्या जागतिक महिला दिनानिमित्त ताराबाई शिंदे वुमन्स रन आयोजन केले होते, अत्यंत जल्लोषपूर्ण रंगलेल्या कुमन्स स्न्ना मध्ये झुम्बा डान्स, महात्मा फुले शाळेचे ढोल पथक महिलांमध्ये उत्साह भरत होते. सकाळी साडेसहा वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हिरवी झेंडी दाखवून मॅरेथॉनला सुरुवात झाली. प्रशांत शिंदे, डी. एस. लहाने, गजानन धिरके, मालती शेळके, मृणाल सपकाळ, बॉडी बिल्डर पौर्णिमा सोनुने यांची प्रमुख उप स्थिती या मॅरेथॉन प्रसंगी लाभली होती. या स्पर्धेचा उत्साह वाढवण्यासाठी क्रीडाप्रेमी, चाहते आगि सहभागी महिलांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तीन किलोमीटर १२ ते१८ वयोगटात प्रथम क्रमांक मृणाल पढोळसे, द्वितीय क्रमांक साधना राऊत, तृतीय क्रमांक मंजिरी चिखले यांना मिळाला. तीन किलोमीटर १८ ते ४० या वयोगटात प्रथम क्रमांक प्रतिभा बोडखे द्वितीय क्रमांक-दीपशिखा हिवाळे, तृतीय क्रमांक-दिपाली काळे यांना मिळाला, तीन किलोमीटर ४० वर्षावरील वयोगटात प्रथम क्रमांक-शीतल मोगल द्वितीय क्रमांक पुष्पा इंगळे, तृतीय क्रमांक-अनिता बुबुंदे यांना मिळाला पाच



किलोमीटर वयोगट १८ ते ४० यामध्ये प्रथम क्रमांक- श्रुती मोरे, द्वितीय क्रमांक-कविता डोईफोडे, तृतीय क्रमांक अर्पिता भोलानकर यांना मिळाला तर पाच किलोमीटर ४० वर्षावनील वयोगटात प्रथम क्रमांक अनिता राठोड, द्वितीय क्रमांक अनिता कापरे, तृतीय क्रमांक प्रगती डुकरे यांना मिळाला सर्व मॅरेथॉन विजेतांचे मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व रोपटे देऊन गौरविण्यात आले. ६०० पेक्षा जास्त महिलांनी या बूमनरन मध्ये सहभाग घेतला होता. बैंड अंबेसिडर विद्या बेडा जाळगाव यांची उप-स्थिती उत्साहावर्धक होती. ही मेरेचॉन यशस्वी आयोजन करण्यासाठी ज्ञानगंगा रनर्स ग्रुपच्या डॉ. वर्षा तांगडे, सुलभा पाटील, प्रियंका सुरुते, डॉ. अश्विनी जाधव, अॅड. जयश्री राखीहे, आशा पाटील, स्वाती शेळके, सुजाता नाफडे, निमा जाधव, डॉ. शारदा वाघ, यांचेसह संपूर्ण ज्ञानगंगा रनर्स ग्रुपच्या महिला सदस्यांनी पुढाकार घेतला होता

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958